मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१३०५.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

जावक क्र.: व.वि.श.म./अग्निशमन/मुका/०८/२०१८-१९
दिनांक : ०५/४/२०१८

TO,
**THOMAS BAPTISTA HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE,**
PAPDY, Vasai ,
Tal – Vasai, Dist - Palghar
Pin -401207,

# FIRE SAFETY CERTIFICATE

Certified that the **THOMAS BAPTISTA HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE** at Papdy,Vasai, Dist- Palghar 401207 Comprised of Gr.+1 (Upper floor) occupied by **THOMAS BAPTISTA HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE** have complied with the fire prevention and fire safey requirements in accordance with rule of State fire service Rules, and verified by the officers concerned of Fire service on. 28/03/ 2018 in the presence of principal of Collage, **Mr. JAMES D'SILVA** Principal of the **THOMAS BAPTISTA HIGH SCHOOL & JUNIOR COLLEGE**, Papdy,Vasai, Dist- Palghar 401207 and that the building /premises is Fit for occupancy class 1st to12th (English medium) with effect **from period of 1 (One) Year** in accordance with rule and subject to compliance of the condition .

**The party has paid Rs.5,000/- Book No. 6461, Receipt No. 646005 Dated : 04/04/2018.**

VASAI-VIRAR CITY MUNICIPAL CORPORATION
FIRE BRIGADE
DIST. PALGHAR

**Dilip M.Palav**
**Chief Fire Officer**
Vasai Virar CityMunciple Corporation

O/C

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पूर्व),**
**ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.**

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

**दूरध्वनी :** ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
**फॅक्स :** ०२५० - २५२५१०७
**ई-मेल:** vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. :** व.वि.श.म./अग्नि/मुका/१०५५/१
**दिनांक :** २८/०२/२०१८

## ना हरकत दाखला

प्रति,
डॉ .संतोष बुधाजी कडुळकर,
कुडाळकर मॅटेर्निटी ॲन्ड नर्सिंग होम,
एम-२,३, वेस्ट ॲव्हेन्यू सोसायटी, नालासोपारा (प.)
ता.वसई, जि.पालघर.

वसई-विरार शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रात व क्षेत्रालगत अग्निशमन विभागात सादर केलेल्या अर्जानुसार " कुडाळकर मॅटेर्निटी ॲन्ड नर्सिंग होम," या नावाने सुरु केलेल्या व्यवसायाच्या ठिकाणी करावयाची अग्निशमन व्यवस्था व सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाच्या खबरदारीचे अनुषंगाने अग्निशमन यंत्रणेची तपासणी करुन या विभागाच्या खालील शर्ती व अटींची पूर्तता करण्याचे अधिन राहून केवळ दिलेल्या तारखेपासून फक्त १ वर्षाच्या कालावधीसाठी अग्निशमन तांत्रिक अभिप्राय देण्यात येत असुन तद्नंतर नुतनीकरण करणे बंधनकारक राहील.

"महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ अन्वये अधिनियमाच्या कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उत्तम व कार्यक्षम इमारतीमधील आग प्रतिबंधक जीवसंरक्षक उपाययोजना संबंधी केलेल्या व्यवस्थेची वर्षातुन दोनदा जानेवारी व जुलै महिन्यात लायसंन्सप्राप्त अभिकरणाकडून तपासणी करुन, तसे प्रमाणपत्र अग्निशमन विभागाकडे सादर करावयाचे आहे."

**अटी व शर्ती**

१. व्यवसाय इमारतीत जीना, पॅसेज इत्यादी भाग कायम स्वरुपी मोकळे राहतील याची दक्षता घ्यावी व बाहेर पडण्याचे मार्ग (फायर एक्झीट) चिन्हाने दर्शविण्यात यावे.
२. व्यवसायस्थळी असणारी विद्युत व्यवस्था स्पार्कप्रुफ व आपोआप खंडीत होण्याची व्यवस्था असावी व आय.एस.आय मार्क साहित्याने मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून करुन घेऊन ती पूर्णत: सुरक्षित असल्याचे प्रमाणपत्र घ्यावे.
३. व्यवसाय ठिकाणी ए.बी.सी टाईप (५ की.) ३ नग, ए. बी. सी. टाईप (२ कि.) ३ नग, ए. बी. सी. टाईप (१कि.) २ नग सी. ओ. टू टाईप (३ कि.) १ नग ठेवण्यात आले असुन ते क्षेत्रफळा नुसार जास्त ठेवणे गरजेचे आहे.
४. व्यवसाय संबंधित व्यक्ती, कर्मचारी अथवा स्वयंसेवक यांना आग विझविणे, रुग्णांना त्वरीत व सुरक्षितपणे बाहेर काढणे, अग्निशमन उपकरणांचा वापर याबाबत किमान प्राथमिक माहिती असावी. वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात यावे.
५. इमारतीत पुरेशी वायुव्हिजन व्यवस्था (व्हेंन्टीलेशन) व पर्यायी इमरजंन्सी लाईटची व्यवस्था करण्यात यावी.
६. **व्यवसायस्थळी इमारतीमध्ये अत्यावश्यक सेवेचे दुरध्वनी क्रमांक जसे फायर ब्रिगेड, पोलीस, दवाखाना इत्यार्दीचे ठळक अक्षरात दर्शनी भागात ठेवले पाहिजे.**
७. प्रत्येक मजल्यावर हस्तचलीत इलेक्ट्रिक भयसूचना यंत्रणा बसविण्यात यावी.
८. आपत्कालीन प्रसंगी इमारती मधील जाण्यायेण्याचा मार्ग अग्निशमन वाहन पोहचण्याच्या दृष्टीने मोकळा ठेवण्यात यावा.
९. इमारतीमधील अग्निशमन यंत्रणेची स्थिती केव्हाही तपासणी करण्याचे अधिकार संबंधित अग्निशमन अधिकारी यांचेकडे राहतील.
१०. अग्निशमन यंत्रणेबरोबर बारीक वाळुने भरलेल्या बादल्यांसह पुरेशा पाण्याचा साठा ठेवण्याची व्यवस्था करावी.
११. सर्व रुग्णालयांनी संबंधित अग्निशमन अधिकाऱ्यांच्या मदतीने वर्षातुन किमान एक मॉक ड्रिल करुन घेणे बंधनकारक राहील.
१२. व्यवसायामुळे निर्माण होणाऱ्या टाकाऊ पदार्थांची, सांडपाण्याची योग्य ती विल्हेवाट लावावी, अशा पदार्थामुळे मानवी जीवन व पर्यावरण यांना हानी पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी.
१३. वसई-विरार शहर महानगरपालीकेचे अनधिकृत बांधकाम कारवाईस बाधा न येता फक्त अग्निशमन बाबींसाठी ना हरकत दाखला / अभिप्राय देण्यात येत आहे.
१४. नविन बांधकामासाठी वापर परवाना घणेपूर्वी कॅपीटेशन फी / कर भरणे बंधनकारक आहे.
१५. प्रत्यक्ष व्यवसाय सुरु करणेपूर्वी सर्व प्रकारच्या शासकीय, निमशासकीय व इतर परवानग्या संबंधित कार्यालयाकडून घेण्यात याव्यात. हा ना हरकत दाखला/ अभिप्राय कुठल्याही प्रकारचा पुरावा म्हणून वापरण्यात येऊ नये. असे केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.
१६. व्यवसायसंबधी कुठल्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास, सर्व प्रकारचे तक्रारींचे निरसन (खुलासा) करण्याची जबाबदारी अर्जदार व्यावसायिकांवर राहील, याबाबत अग्निशमन विभाग जबाबदार राहणार नाही.
१७. ना हरकत दाखल्याचे नुतनीकरण वेळोवेळी शासन निर्णयांत होणारे बदल व फी वाढ भरणा बंधनकारक राहील.
१८. सदरहू अग्निशमन तांत्रिक अभिप्राय निर्गमीत केल्याच्या दिनांकापासून फक्त १ वर्ष कालावधीसाठी वैध राहील. तद्नंतर अग्निशमन तांत्रिक अभिप्राय नुतनीकरण करताना त्या त्या वेळी अस्तीत्वात असलेली अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित ठेवणे आपणांवर बंधनकारक असेल.
१९. दाखला फी रु. ५०००/- पावती क्रमांक. ६३५९५६, पुस्तक क्रमांक. ६३६० दिनांक २७/०२/२०१८ रोजीचा भरणा.
२०. मालक / भोगवटादार यांनी दरवर्षी जानेवारी व जुलै महिन्यात लायसन्स प्राप्त अभिकरणाकडून अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत कार्यरत असले बाबत प्रमाणपत्र सादर करणे www.maharashtrafireservice.org किंवा www.mfsindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

O/C
Recd

वसई - विरार शहर महानगरपालिका
अग्निशमनदल
मुख्य कार्यालय

मुख्य अग्निशमन अधिकारी
वसई-विरार शहर महानगरपालिका